महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक

छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम , हुतात्मा स्मारकच्या मागे, सी.बी.एस, नाशिक

email:- dsonashik.dsys-mh@gov.in

जि.क्री.अ./क्रीडा योजना/2020-21 दि. 02/08/2021

प्रती,

डॉ. मिनाक्षी गवळी
संचालक,शारिरिक शिक्षण व क्रीडा
के.एस.के.डब्ल्यु, महाविद्यालय, सिडको,
नाशिक

विषय — जिल्हास्तर क्रीडा योजना राबविणे बाबत..

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या व्यायामशाळा विकास योजनेंतर्गत आपण आपल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरीता ओपन जिम बसविण्या करीता परीश्रम घेतले आणि सदर योजना आपण यशस्वीरित्या राबविली या बद्दल आपले जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालया मार्फत हार्दिक अभिनंदन.

(रविंद्र नाईक)
जिल्हा क्रीडा अधिकारी
नाशिक

महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक.

छत्रपती शिवाजी स्टेडियम, कोर्टाच्या समोर नाशिक. दूरध्वनी :- २५७७७१९

दिनांक:-

जा.क्र.जिक्रीअ/प्र.मा./व्याविअ/सर्वसा/२०१९-२०/का-५/

विषय :- व्यायाम शाळा विकास अनुदान सन २०१९-२० (सर्वसाधारण योजना).

संदर्भ :- १.शासन निर्णय क्रं.क्रीडाधो-संकीर्ण/प्र.क्र.४९/क्रीयुसे-१ दि.०८ जानेवारी, २०१९.

२. मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचे पत्र क्रं.जाक्र/नियोजन/कक्ष-१२/संस३/जिवायो-१९-२०/लेखाशिर्ष/१२७४ /२०१९ दि.२९/०५/२०१९.

३.मा.जिल्हाधिकारी नाशिक यांचे प्रशा.मा.आदेश क्रं./जिनिस/क्रं.१२/संस.३/१९-२०/२५३९ दि.१७/०९/२०१९

४.मा.जिल्हाधिकारी नाशिक यांचे निधी वि.आदेश क्रं./जिनिस/क्रं.१२/संस.३/१९-२०/२५४० दि.१७/०९/२०१९.

मंजुरी आदेश :-

उपरोक्त विषयाच्या शासन निर्णयाच्या अधिन राहुन व मा.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक हे खालील ८० संस्थांना त्यांच्या नावांपुढे दर्शविल्यानुसार एकुण रु १३२.२२ लक्ष (अक्षरी रु.एक कोटी बत्तिस लाख बाविस हजार रु.मात्र) सहायक अनुदान मंजुर करण्यासाठी मंजुरी देत आहे.

| अ. क्र | अनुदानित संस्थेचे नांव व पत्ता | अनुदानाचा हेतु | अंदाजपत्रकाची रक्कम (लक्षात) | संदर्भिय क्रं.०३ व ०४ च्या आदेशान्वये प्रशा. मंजुरी प्रदान केलेलीरक्कम(लक्षात) | मंजुर अनुदान रक्कम (लक्षात) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्रं.०६ मध्ये स.नं.५३/७/९ मातोश्री नगर, गणेश मंदिर येथे खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |
| ०२ | प्रभाग क्रं.०६ मध्ये स.नं.५२ उदय नगर, हनुमान मंदिर येथे खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |
| ०३ | प्रभाग क्रं.०१ मधील गजवंथ हौसिंग सोसायटीमध्ये खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |
| ०४ | प्रभाग क्रं.०१ मधील ओम नगर, म्हसरुळ, पंचवटी येथे खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |
| ०५ | प्रभाग क्रं.०३ मध्ये सर्वे नं.२४५ चक्रधर नगर पंचवटी येथे खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |
| ०६ | प्रभाग क्रं.०३ मध्ये सर्वे नं.२०२, एस.एस.डी.नगर मागील परिसर, पंचवटी येथे खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |
| ०७ | प्रभाग क्रं.०५ मध्ये स्वामी समर्थ केंद्र शेजारी खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |
| ०८ | प्रभाग क्रं.०५ मध्ये शिंदे नगर येथील गार्डनमध्ये खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |
| ०९ | प्रभाग क्रं.०४ मध्ये सर्वे नं.१३२ श्रीराम नगर येथे खुली व्यायाम शाळा साहित्य बसविणे. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०२ (प्रथम हप्ता) |

04.10.19 प्री. लाल

NDMVP Samaj's
Arts, Science and Commerce
College, CIDCO, Nashik - 8.
Inward No. 705/2019-20
Date 11 /10 /2019

Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जि.नाशिक. | बांधकाम | | | |
| ६१ | ग्रा.पं.जोगलटेंभी, ता.सिन्नर, जि.नाशिक. | व्यायाम शा. बांधकाम | ०७.०० | ०७.०० | ०२.३८ (प्रथम हप्ता) |
| ६२ | ग्रा.पं.भडाणे, ता.बागलाण, जि.नाशिक. | व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ६३ | ग्रुप ग्रा.पं.राजापुर (प्रकल्प सोमठाण जोश), ता.येवला,जि.नाशिक | व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ६४ | ग्रा.पं.चेहडी, ता.निफाड, जि.नाशिक. | व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ६५ | ग्रुप ग्रा.पं.आनंदपुर, प्रकल्प आनंदपुर,ता.बागलाण, जि.नाशिक. | व्यायाम शाळा बांधकाम | ०७.०० | ०७.०० | ०२.३८ (प्रथम हप्ता) |
| ६६ | ग्रुप ग्रा.पं.वाडीपिसोळ, प्रकल्प एकलहरे, ता.बागलाण, जि.नाशिक. | व्यायाम शाळा बांधकाम | ०७.०० | ०७.०० | ०२.३८ (प्रथम हप्ता) |
| ६७ | ग्रा.पं.कंजवाडे, ता.मालेगांव, जि.नाशिक. | व्यायाम शा. बांधकाम | ०७.०० | ०७.०० | ०२.३८ (प्रथम हप्ता) |
| ६८ | ग्रा.पं.पुरी, ता.चांदवड, जि.नाशिक. | व्यायाम शा. बांधकाम | ०७.०० | ०७.०० | ०२.३८ (प्रथम हप्ता) |
| ६९ | ग्रा.पं.सावरगांव, ता.नांदगांव, जि.नाशिक. | व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ७० | ग्रा.पं.नगाव, ता.मालेगांव, जि.नाशिक. | व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ७१ | न.प.येवला अंतर्गत कै.भाऊलाल लोणारी क्रीडा संकुल, येवला, जि.नाशिक | व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ७२ | मराठा विद्या प्रसारक सामाजाचे, कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नाशिक. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ७३ | मराठा विद्या प्रसारक सामाजाचे,विधी महा.नाशिक. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ७४ | मराठा विद्या प्रसारक सामाजाचे,होरॉयझन ॲकेडमी, ज्युनि कॉलेज ऑफ सायन्स ॲन्ड कॉमर्स, नाशिक. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ७५ | मराठा विद्या प्रसारक सामाजाचे, कर्मवीर दुलाजी सिताराम पाटील कृषी महा.नाशिक. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ७६ | मराठा विद्या प्रसारक सामाजाचे,कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिक. | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.५० | ०३.५० | ०१.१९ (प्रथम हप्ता) |
| ७७ | ग्रा.पं.देवळाणे, ता.बागलाण, जि.नाशिक. | व्यायाम शा. बांधकाम | ०७.०० | ०७.०० | ०२.३८ (प्रथम हप्ता) |
| ७८ | ग्रा.पं.सुराणे, ता.बागलाण, जि.नाशिक. | व्यायाम शा. बांधकाम | ०७.०० | ०७.०० | ०२.३८ (प्रथम हप्ता) |
| ७९ | ग्रा.पं.वडाळीभोई, ता.चांदवड, जि.नाशिक | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०३.०० | ०३.०० | ०१.०० (प्रथम हप्ता) |
| ८० | मराठा विद्या प्रसारक समाजाचे, के.एस.के.डब्यु.कॉलेज, सिडको, नाशिक | खुली व्यायाम शाळा साहित्य | ०४.०० | ०४.०० | ०१.०० (प्रथम हप्ता) |
| | | | एकुण | ३९०.०० | १३२.२२ |

(अक्षरी रुपये एक कोटी बत्तीस लक्ष बाविस हजार मात्र)

उपरोक्त अनुदान संबंधित संस्थांना खालील अटींवर मंजुर करण्यात येत आहे.

०१.मंजुर झालेल्या अनुदानाचे हिशोब हे महालेखापाल यांच्या लेखा पथकास, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या प्रतिनिधीस, संबंधित उपसंचालक अथवा जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांना त्यांच्या मागणीनुसार तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील.

०२.मंजुर अनुदान ज्या तारखेला संबंधित संस्थेस ज्या उद्दिष्टांसाठी मंजुर झाले आहे, त्याच उद्दिष्टांसाठी दोन वर्षाच्या आत खर्च करावे लागेल.

Scanned with CamScanner

०३.मंजुर अनुदान दोन वर्षाच्या आत संस्थेच्या विहित हिश्यासह खर्च न केल्यास अनुदानाची संपुर्ण रक्कम सव्याज शासनाकडे परत करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

०४.मंजुर अनुदानातील काही रक्कम शिल्लक राहिल्यास सदर रक्कम जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांच्या मार्फत चलनाव्दारे कोषागारात जमा करावी व सदर रक्कम शिल्लक राहीली याची सविस्तर कारणे कार्यालयास कळवावीत.

०५.संस्थांनी विहित मुदतीत शासकीय अनुदान (व्यायामशाळा बांधकामासाठी) संस्थेच्या हिश्यासह खर्च करुन विहित नमुन्यातील विनियोग प्रमाणपत्र, लेखाविवरण पत्र, सनदी लेखापाल यांच्या स्वाक्षरीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

०६.प्रस्तावासोबत सादर केलेली कागदपत्रे / माहिती चुकीची आढळुन आल्यास मंजुर अनुदानाची रक्कम या आदेशाच्या तारखेपासुन सव्याज वसुल करण्यात येईल.

०७.या योजनेअंतर्गत लाभार्थी संस्थांना व्यायाम साहित्य खरेदेसाठी अनुदान उपलब्ध करुन दिलेले असल्यास शासनाच्या वतीने साहित्याचा पुरवठा झाल्यानंतर, व्यायाम साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे पत्र साहित्याच्या फोटोसह सादर करणे संबंधित पुरवठादारांवर बंधनकारक असेल.

०८.जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांनी शासन निर्णयानुसार व्यायाम शाळा विकास अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थी संस्थांना क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने निश्चित केलेल्या दरपत्रकानुसार व्यायाम साहित्य पुरवठा झाल्यानंतर लाभार्थी संस्थेकडून त्यांना साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे पत्र साहित्याच्या फोटोसह प्राप्त करुन घेऊन पुरवठादारास रक्कम अदा करावी.

०९.व्यायाम शाळा विकास अनुदान योजनेअंतर्गत साहित्य खरेदी करिता अनुदान मंजुर करण्यात आलेल्या खाजगी संस्थांनी प्रथम त्यांच्या हिश्याची २५ टक्के रक्कम धनाकर्षाव्दारे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे.

१०.जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेतील नमुद सर्व प्रस्ताव मा.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे/ उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नाशिक विभाग, नाशिक यांच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधीच्या मागणीनुसार तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील.

११.संस्थेने जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयात सादर केलेल्या प्रस्तावांमध्ये त्रुटी आढळुन आल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख यांची राहील.

१२. सदर प्रकल्प राबविण्याच्या ठिकाणी खालील प्रमाणे फलक लावणे बंधनकारक आहे.

| |
|---|
| महाराष्ट्र शासन<br>जिल्हा नियोजन समिती, नाशिक<br>जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक मार्फत व्यायाम शाळा विकास अनुदान योजना सन २०१९-२०<br>प्रकल्पाचे नांव :-<br>मंजुर अनुदान :- |

सदरहु खर्च सन २०१९-२० च्या मंजुर तरतुदीतुन भागविण्यात यावा व तो २२०४ क्रीडा व युवक सेवा – १०४- क्रीडा व खेळ-(४२)जिल्हा योजना नाशिक (४२)(०७) व्यायामशाळांना सहाय्यक अनुदान (२२०४-४७८२) -३१ सहाय्यक अनुदान (वेतनत्तर) मागणी क्रमांक ई- या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

(रविंद्र नाईक)
जिल्हा क्रीडा अधिकारी,
नाशिक.

प्रत माहितीस्तव सादर :-

१.मा.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे.
२.मा.उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नाशिक विभाग, नाशिक.
३.मा.महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपुर.
४.मा.जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
५.संचालनालयातील कार्यासन क्रं.०१ व ०३ (ताळमेळ विभाग)
६.संबंधित अनुदानित संस्था

Scanned with CamScanner